International Indexed & Referred Research Journal, September- 2012, ISSN 0974-2832, RNI- RAJBIL 2009/ 29954; Vol. IV * ISSUE- 44

शोध पत्र- मराठी

# झेलझपाट : एक अभ्यास
# (ZELZAPAT : A STUDY )

* योगेश गोरखनाथ रावते

September,2012

* सह-प्राध्यापक, यशोदीप अध्यापक विद्यालय ( डी.एड. ) जबिंदा कॉर्नर, औरंगाबाद ( महाराष्ट्र )

अलीकडे गेल्या काही वर्षापासून मराठी साहित्यात आदिवासी साहित्य हा एक नवा प्रवाह अस्तित्वात आला. आदिवासी समूहाच्या संदर्भात कथा, कादंबऱ्या फार पूर्वीपासूनच लिहील्या गेल्या आहेत. पण आदिवासी साहित्य जाणीवा ही संकल्पना अलीकडे आकारास आली. साठोत्तरी कालखंडात मराठी साहित्यात आदिवासीब्रद्दल नव्या जाणीवा निर्माणा झाल्या त्यासाठी काही गोष्टी कारणीभूत ठरल्या "१९६० नंतर जीवनाच्या सर्व क्षेत्रात भौतीक प्रगतीचे वेध लागले दळणवळणाच्या साधनांमध्ये क्रांती झाल्यामुळे आदिवासींचा नागरी जीवनात प्रवेश झाला"[१]

आदिवासी शब्दाचा अर्थ सामान्यतः जंगलात वास्तव्यास असणारा एक समुह. "पशुपाल जगात, पशुपुजक जगात, पहाडी जंगली जगात, प्राचीन जगात राहणारे गिरीजन वनवासी म्हणजे आदिवासी."[२]

डॉ. मधुकर वाकोडे लिखीत झेलपाट कादंबरी सन १९८८ ला प्रकाशित झाली अल्पावधीतच लोकप्रियता लाभलेल्या या कादंबरीस १९८९ ला महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पूरस्काराने गौरविण्यात आले.

आदिवासी जीवनावरील ही कादंबरी अमरावती जिल्हयातील, मेळघाट परिसारातील कोरकू जमातीच्या जीवनावर आधारीत आहे. आदिवासी ग्रामीण आणि देश याविषयीच्या जाणीवांचा काहीसा आदर्शवादी अविष्कार करणारी कादंबरी आहे.

झेलझपाट ही घटनाप्रधान कादंबरी, अनेक घटनांमधून ती गतीमान बनली आहे. यातील प्रत्येक प्रसंग उभा करतांना डॉ. वाकोडे आपले कौशल्य पणाला लावतांना दिसतात. 'भांगाने केसाचे जंगल दुभागले जावे तसा तारुबांधा दोन ढाण्यात विभागाला होता'. येथे उपमा अलंकाराचा पाऊस पडतांना दिसतो. शब्दांना अर्थ, अर्थाला लय मिळतो, सारावर्णनाचा थाट नादानुकारी बनतो. घटना प्रसंग डोळयासमोर उभे राहतात. नायक 'केरु' नायिका 'फुलय' मधील प्रेमळ हितगुज, बाजार, होळी पौर्णिमा, डॉक्टरांचे भाषण, आंगणवाडी बाईच्या मनातील वेदना, एका प्रेमकहाणीचा गुढ शेवट या साऱ्या प्रसंगाना नाटयात्मकता, चित्रात्मकता लाभाली आहे. हे सारे प्रसंग मनाला चटका लावून जातात हे प्रसंग उभे करण्याची कादंबरीकाराची हातोटीच निराळी आहे. होळी सणानंतर त्यांची खान्याची पंचायत होते. तरी ते पर्वा न करता होळी हा सण मोठया उत्साहाने साजरा करुन पारंपारिक वारसा जपतांना दिसतात.

पात्रांच्या मनातील भावाभावणांचे चित्रण लेखकाने अत्यंत चपलपणे केलेले आहे. यामधील व्यक्ती प्रामुख्याने परिस्थितीशी लढतांना त्रासलेल्या, हाताश झालेल्या दिसतात. परंतु जीवन जगण्याची त्यांची धडपड दिसून येते. प्रत्येक पात्राचा स्वभाव वेगळा आहे.यातून जीवनगाथा अभिव्यक्त होताना दिसते. "अमरावती जिल्हयातील मेळघाट भागातील कोरकु या आदिवासींच्या जीवनाचा विदारक आलेख काढणारी झेलझपाट ही अशीच एक कादंबरी आहे"[३] कादंबरीतील निसर्गाला तेथील प्रदेश उभा करण्याच्या दृष्टीने, निसर्गाचे सुक्ष्म वर्णन करुन वाचकांसमोर वास्तव उभे करण्याची प्रत्येक लेखकाची वेगळी शैली असते. त्या प्रमाणे निसर्गाचे मनोवेधक रुप त्यांनी चित्रित केले आहे.कादंबरीतील देवदेवता, विवाहपध्दती सण, उत्सव, शारीरिक कष्ट, भ्रष्टाचार अन्यायाविरुध्द चीड, ऋतूचक्र, चालीरिती, प्रेमकहाणी यांची अतिशय कलात्मकतेने मांडणी केलेली दिसते. येथे आदिवासींचा प्रश्न वेगळया पध्दतीने मांडला आहे. परसापूर, मेळघाट, परतवाडा, चिखलदरा, गंगाझरी, हरिसाल, गौलखेड या गावाचे वास्तव चित्रण आहे.

कोरकू समाजावर अन्याय होतो सर्वजण त्यांना लुटतात, आपण अन्यायाला बळी पडत आहोत याची जाणीव नायकाला होते. त्याविरुध्द तो मोठया धाडसाने लढतो. परंतु शेवटी एकटा पडतो त्याच्या जातीच्या लोकांना त्याचे काही देणे- घेणे नसते. अन्यायाविरुध्द लढतो म्हणूनच त्याचे त्याला वाईट परिणाम भोगावे लागतात.

कादंबरीत अतिशय रेखीव, ठाशीव पात्रे उभी केली आहेत. अर्थपूर्ण प्रसंग, सणांचे चित्रण हुबेहुब वर्णन करुन एक वेगळेपणा निर्माण केला आहे. प्रचलित वळणाची कादंबरी निर्माण न करता आदिवासींच्या जीवनावर आधारीत एका नव्या विषयाला हात घालणारी कादंबरी लिहून मराठी कादंबरीचे एक नवे दालन खुले केले आहे. कादंबरी मध्ये वापरलेली भाषा, उभी केलेली व्यक्ती चित्रणे तसेच अधुन मधुन वापरलेली रांगडी हिंदी भाषा, आदिवासी बोली, गाणे आणि हृदयस्पर्शी संवादामुळे ती अगदी मनाला भिडते. कादंबरीत कोरकूंच्या समस्या केंद्रित झालेल्या दिसत असल्या तरी त्यांच्या जीवनाचे दर्शन अत्यंत व्यापक आहे. एकीकडे सधन गवळी ढाणा (वस्ती) व दुसरीकडे अंगावर कपडे नसणाऱ्या कोरकु स्त्रीया असे असूनही फक्त 'समस्याग्रस्त कादंबरी' अशा मर्यादीत चौकटीत ही साहित्यकृती राहत नाही. कोरकू जमात म्हणजे नशापाणी करणारी, मरण येत नाही म्हणून जगणारी स्वतः बदलची जाणीव हरवलेली माणसं इथे भेटतात. कादंबरीत जे वास्तव चित्रण केले आहे त्यात सयंमाचा बांध फुटतो "लोकरिती,

परंपरा, भाषा या बाबत झेलझपाट ही कादंबरी अधिक सरस आहे. कारण लेखक डॉ. वाकोडे आदिवासी परिसरात राहतात असेच नाही तर त्या लोकजीवनाचे त्यांनी सातत्याने जे अवलोकन केले आहे त्याचे हे दृष्य फळ आहे."[४] आदिवासी लोकांचा लढा हक्कासाठी, न्यायासाठी नाही तर तो पोटासाठी आहे. अधिकार , हक्क, नियम, कायदे त्यांच्या पासून खुप दूर आहे. तारुबांधाच्या कोरकू ठाण्यातील आदिवासींचे जीवन हा झेलझपाट चा विषय आहे. त्याच बरोबर निसर्गातील नितळ वाहणाऱ्या झऱ्यासारखा प्रेमाचा अनुभव आहे. तसेच आदिवासी समूह त्यांची व्यथा, वेदना, हाच कादंबरीचा महत्वाचा भाग आहे. शासनाकडून

दुर्लक्षित झालेल्या तसेच भ्रष्टाचारी लोकांशी 'कासम' सारख्या दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांशी या गरीब, लाचार, शोशीत निरक्षरांचा लढा हा या कादंबरीचा मूख्य विषय आहे.

आदिवासी समाजात राहुनही नव्या विचारांची जाणीव नायिकेला होते तिच्या मनात नाविण्यांची ओढ दिसून येते. व्यवहारी जगापासून दुरावलेली अज्ञानामुळे कायदयापोटी उच्च वर्णीयांकडून फसवल्या गेलेल्या आदीवासी जमार्तीच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन लुबाडणारे कित्येक जण पाहायला भेटतात. सरकारी उपक्रमातून चालवलेल्या सोसायटयांमधून वाकडया मार्गाने खिसे भरणारे सेठ निरक्षर आदीवासींना आर्थिक व्यवहारात फसवून व्याज वसूल करतात. व्यापारी त्यांच्या मालावर झडप घालतात आणि चौकशी झालीच तर दोन रुपये देऊन रेकॉर्ड तयार ठेवले जाते.

आदीवासी समाजात शिक्षणाचा प्रसार अजूनही फारसा झालेला नाही. हक्क, अधिकार, कायदा स्वातंत्र्य, पारतंत्र्य यांची जाणीव अजूनही त्यांच्यापर्यंत पोहोचलेली नाही. शिकलेल्या केरुवर (नायक) आपण प्रेम करतो याचा फुलयला (नायिका) सार्थ अभिमान वाटतो. त्यांच्या प्रेमाची ही भावकथा आजच्या स्त्रीमुक्तीच्या काळात पूष्कळ काही सांगून जाते. खूप काही विचार करायला लावते. ते दोघे पळून जावून लग्न करु शकत होते परंतू ते त्यांच्या विचारात बसत नाही. तरुण सळसळत्या रक्ताच्या नव्या जाणीवा होऊन आलेल्या नायकाला ते परवडणारे नाही. त्याची प्रेमकहाणी हुरहूर लावणारी आहे.अशा या बावण्णकशी प्रेमाची कहाणी कादंबरीतून येते.

हि कादंबरी मनुष्य जीवनासंबंधी, स्वभावासंबंधी अनेक प्रश्न मांडते अन् खोलवर विचार करायला भाग पाडते. यातून कादंबरीकाराची जीवनदृष्टी आदिवासी विषयीचे प्रेम, आत्मियता निरनिराळया समाजातील वेगवेगळया स्वभावाच्या सामान्य माणसांच्या मनातील भावना, कल्पना, इच्छा तसेच व्यक्तींचे गुणदोष दाखविण्याचा प्रमाणिकपणा दिसून येतो. यातून लेखकाच्या जीवनानुभवाची व निरीक्षणाची कल्पना येते.

**निष्कर्ष :-**

- आदीवासी कादंबरीत डॉ. वाकोडेंच्या झेलझपाट कादंबरीस अनन्यसाधारण महत्व आहे.
- पुढारलेला समाज आदिवासींना गुलाम म्हणून वागणूक देतो. आणि हा निरक्षर आदिवासी समाज विवेक शुन्य होऊन जीवन जगतो. त्यांना अधिकारांविषयी जाणीव झालेली नाही.
- आदीवासी जमातीसाठी सरकारकडून ज्या योजना राबविल्या जातात. त्याचा त्यांना फारसा उपयोग होत नाही. आत्मभान येण्यासाठी प्रबोधन होणे आवश्यक असते. जो पर्यंत त्यांचे प्रबोधन होत नाही, अज्ञान दूर होत नाही तोपर्यंत त्यांचा विकास होणे अशक्य आहे.
- डॉ. वाकोडे सामाजिक बांधिलकी मानणारे लेखक आहे. प्रबोधन आणि सामाजिक उन्नयन हेही साहीत्याचे प्रयोजन असते त्याचा प्रत्यय झेलझपाट मधून येतो.
- ठराविक चक्रव्युहातून या समाजाला बाहेर काढून विज्ञानाने प्रगती झालेल्या, पुढारलेल्या समाजाच्या प्रवाहात आणण्याची आज गरज आहे.

माणूस म्हणून आदीवासींना जगता यावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ


१) डॉ. मुनघाटे प्रमोद :- 'ऐसी कळवळयाची जाती' प्रा. रमाकांत गौरव ग्रंथ, पृष्ठ क्र. २६८ प्रा. रमाकांत कोलते गौरव समिती, यवतमाळ २००१.

२) ॲड मोरे माधव बंडू :- 'आदिवासी बोलू लागला' पृष्ठ क्र. ०१ सुगावा प्रकाशन, औरंगाबाद

३) मुन्हेकर जनार्दन :- 'आदिवासीच्या जीवनाचा विदारक आलेख' दैनिक लोकसत्ता मुंबई / पूणे दि. २० ऑगस्ट १९८९

३) डॉ. तिडके श्रीकांत :- 'ग्रंथायन' दै. लोकमत दि.०६ ऑक्टोबर १९९१